रयत शिक्षण संस्थेचे

अण्णासाहेब आवटे आर्ट्स, कॉमर्स & हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज, मंचर

ता. आंबेगाव जि.पुणे

मराठी विभाग

वाचन प्रेरणा दिन अहवाल 2023-24

दि. १६.१०.२०२३

अहवाल

महाविद्यालयातील मराठी विभागा अंतर्गत दि.१५ ऑक्टोबर २०२३ रोजी भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयातील ग्रंथालयामधील वाचन कक्षात कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांमध्ये वाचन व लेखनाची आवड निर्माण व्हावी व त्याचे महत्त्व पटावे म्हणून विद्यार्थ्यांकडून ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या विविध ग्रंथांचे वाचन सकाळी ११.०० ते दुपारी ०१.०० या वेळेत वाचनाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी विविध विषयातील ग्रंथांचे वाचन केले. या उपक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य प्रो. डॉ. गार्डी बी.पी. व ग्रंथपाल श्री. मेमाणे एस.एम. उपस्थित होतो. या उपक्रमास महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.





